दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८४ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.५ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit ... Epaper Portal

Scan QR code to visit ... Epaper Portal

# नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध

# सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

## उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वीच कोर्टाचा दिलासा

**अमरावती (वृत्तसंस्था)–अमरावतीच्या विद्यमान खासदार आणि भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या जात वैधता प्रमाणपत्र बाबत सर्वोच्च न्यायालयाने आज निकाल दिला आहे. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी बनावट जात प्रमाणपत्र दिल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी उच्च न्यायालयाने त्यांच्या विरोधात निकाल दिला होता. या निर्णयाला नवनीत राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आज सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरवले आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वीच त्यांना दिलासा मिळाला आहे.**

नवनीत राणा जात प्रमाणपत्र प्रकरणी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि संजय करोल यांच्या खंडपीठानं याप्रकरणी निकाल दिला. नवनीत राणांना मोठा दिलासा मिळाला असून नवनीत राणांच्या जात प्रमाणपत्रावर सर्वोच्च शिक्कामोर्तब झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयानं नवनीत राणांचं जात प्रमाणपत्र बनावट असल्याचा निर्णय दिला होता. पण सर्वोच्च न्यायालयानं उच्च न्यायालयाचा निर्णय बदलला आणि नवनीत राणांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे.मुंबई उच्च न्यायालयाने ८ जून २०२१ रोजी खासदार नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले होते. या बरोबरच उच्च न्यायालयाने त्यांना दोन लाख रुपयांचा दंड देखील ठोठावला होता. या निर्णयाला नवनीत राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या संदर्भातला निकाल सर्वोच्च न्यायालय आज जाहीर केला आहे. आजच्या निकालावर नवनीत राणा यांचे भवितव्य अवलंबून होते.भारतीय जनता पक्षाच्या वतीने नवनीत राणा यांना अमरावती लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्याच्या विरोधात महायुतीमध्ये बंड झाल्याचे दिसून येतेय. शिवसेनेचे माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. तर प्रहार जनशक्ती पक्षाचे बच्चू कडू यांनी देखील तो राणा यांच्या उमेदवारीला विरोध करत स्वतंत्र उमेदवार दिला आहे. भाजपमध्ये स्थानिक पदाधिकारी देखील नवनीत राणा यांच्या उमेदवारीवर नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे नवनीत राणा यांच्यासमोरील अडचणी अधिक वाढलेल्या आहेत. त्यात आज सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येणार असल्याने याकडे देखील सर्वांचे लक्ष लागले आहे.भाजपच्या उमेदवार नवनीत राणा या आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी त्या पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवत आहेत. त्यांनी आपल्या प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. त्यातच मीच निवडून येणार असल्याचा दावा देखील त्यांच्याकडून केला जात आहे. या संदर्भात आज त्यांनी सकाळीच अमरावती शहरातील मंदिरांना भेट देत दर्शन घेतले. जात वैधता प्रमाणपत्राचा निर्णय हा माझ्या बाजूने लागणार असल्याचा दावा नवनीत राणा यांनी केला आहे.



## 'आधुनिक अनाजी पंतांनी आमचं घर फोडलं-रोहित पवार



**बुलढाणा (वृत्तसंस्था):** संतांच्या आणि छत्रपती शिवाजी, संभाजी महाराज यांच्या काळात ही अनाजी पंत सक्रिय होते आणि आजही आहे. आधुनिक अनाजी पंतांनी आमचंही घर फोडलं, तीनचार पवार तिकडे गेले. मात्र,त्यांनी लक्षात ठेवावे की, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबीय यांच्यावर काहीच परिणाम होणार नाही. याचे कारण अख्खा स्वाभिमानी राज्यवासी हा शरद पवारांचा परिवार आहे, असे रोखठोक प्रतिपादन राष्ट्रवादीचे युवा नेते रोहित पवार यांनी येथे केले.

बुलढाणा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर जिजामाता प्रेक्षागार नजीकच्या मैदानात आयोजित सभेत बोलताना रोहित पवार यांनीभाजप, केंद्र सरकार, यावर टीकेची तोफ डागली. यावेळी ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे, अंबादास दानवे, सुषमा अंधारे, उमेदवार नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांच्यासह आघाडीचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.यावेळी पुढे बोलताना पवार यांनी, पवार परिवार फोडण्यात 'ते' काहीसे सफल झाले असले तरी भाजप सोबत गेले कोण? तर मूठभर नेते गेले.(लवकरच) पडणारे नेते गेले. आमच्या (राष्ट्रवादी) सोबत असलेले नेते निष्ठावान, लढणारे अन जिंकणारे आहेत, हे त्यांनी ध्यानात ठेवावे. दिल्लीतील 'महाशक्ती' फोडा, झोडा ची नीती वापरत, राज्यात पक्ष, घराणे फोडले. आमच्या बाबतीत जे केले तेच ठाकरेंच्या बाबतीत केले. मात्र त्यांच्यासोबत मूठभर नेते गेले, राज्यातील स्वाभिमानी जनता मात्र अमच्यासोबतच आहे, असा दावा त्यांनी केला.तिकडे जाणारे लाचार नेते आज दिल्लीत लोटांगण घालत जागा, उमेदवारी याची मागणी करीत आहे. मात्र मराठी जनता त्यांच्या सोबत जाऊच शकत नाही, कारण येथील जनता स्वाभिमानी आहे, दिल्ली समोर झुकणारी नाही तर लढणारी आहेअजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाने घड्याळ चिन्हाच्या वापराबाबत दिलेल्या तंबीचा रोहित पवारांनी उल्लेख करून मार्मिक टोले लगावले. त्यांना न्यायालयाने दिलेल्या सूचना लक्षात घेता, 'त्यांच्याकडे' केवळ लोकसभा निवडणुकीपुरतेच घड्याळ असल्याचे दिसते. मूळ राष्ट्रवादीच्या घड्याळाची वेळ १०.१० अशी होती. यांच्या घड्याळाची वेळ मात्र ४.२० मिनिटे (चारशेविस) आहे, अशी खिल्ली त्यांनी उडविली.

## ॲड.प्रकाश आंबेडकरांचा अर्ज दाखल

## अकोल्यात वंचितचे जोरदार शक्तिप्रदर्शन

**अकोला (वृत्तसंस्था):**अकोला लोकसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्यावतीने ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी गुरुवारी अर्ज दाखल केला. पक्ष कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढलेल्या फेरीमध्ये वंचित आघाडीने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. या फेरीमध्ये मोठ्या संख्येने गर्दी उसळली होती.



अकोला लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची ४ एप्रिल ही शेवटची मुदत होती. आज ड. प्रकाश आंबेडकर यांनी शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शहरातील टॉवर चौक येथील कार्यालयातून फेरीला सुरुवात झाली. याठिकाणी सकाळपासूच मोठी गर्दी जमा झाली होती. टॉवर चौक, फतेह चौक, खुले नाट्यगृह, पंचायत समिती मार्गे ही फेरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल झाली. तापत्या उन्हामध्ये ॲड.प्रकाश आंबेडकर, प्रा. अंजली आंबेडकर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी फेरीमध्ये पायदळ सहभागी झाले होते. ॲड.प्रकाश आंबेडकर यांचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी फेरीला संबोधित केले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दुपारी ॲड.आंबेडकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

## राहुल गांधी १३ एप्रिल तर प्रियंका गांधी १५ एप्रिलला विदर्भात

**नागपूर (वृत्तसंस्था):** काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांची विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील साकोली आणि चंद्रपूर येथे प्रचारसभा होत आहे. राहुल गांधी साकोली येथे १३ एप्रिलला आणि प्रियंका गांधी यांची चंद्रपूला १५ एप्रिलला सभा होत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, नागपूर आणि रामटेक येथे १९ एप्रिलला मतदान होत आहे. यासाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू झाला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा विधानसभासंघ साकोली आहे. काँग्रेसने भंडारा-गोंदिया लोकसभेसाठी डॉ. प्रशांत पडोळे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या प्रचारासाठी खुद्द राहुल गांधी येत आहेत.तर चंद्रपूर लोकसभा



मतदारसंघात प्रतिभा धानोरकर काँग्रेसच्या उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारासाठी प्रियंका गांधी चंद्रपूर येथे सभा घेत आहेत. काँग्रेसच्या प्रचार समिती आणि इथर समित्यांची बुधवारी बैठक झाली. यावेळी या दोन्ही प्रमुख नेत्यांच्या पूर्व विदर्भात सभा घेऊन वातावरण निमिर्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## उद्यापासून राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण होण्याचा अंदाज

**पुणे**–राज्यातील विदर्भ, मराठवाडा तसेच कर्नाटक आणि दक्षिण तामिळनाडू पर्यंत हवेच्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे सध्या राज्यात दिवसा उन्हाच्या झळया असह्य होत आहेत. तर रात्री देखील उकाडा टिकून राहत आहे. राज्यात सकाळपासूनच उन्हाचा चटका जाणवत असून दुपारी घराच्या बाहेर पडणे देखील नागरिकांना असह्य झाले आहे. दरम्यान आज उन्हाची तीव्रता कायम राहणार



असून उद्यापासून राज्यात पावसाला पोषक हवामान निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.राज्यातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून अनेक जिल्ह्यांमध्ये ४० अंश पर्यंत तापमान पातळी पोहोचली आहे. त्यातच महाराष्ट्रातील मध्य महाराष्ट्र, तसेच मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळ ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# ईव्हीएम-व्हीव्हीपॅटचे द्वितीय रँडमायझेशन पूर्ण

## निवडणूक निरीक्षक,जिल्हाधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघांतर्गत ईव्हीएम व व्हीव्हीपॅटचे द्वितीय रँडमायझेशन (सरमिसळ ) जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव, निवडणूक निर्णय अधिकारी विनय गौडा जी.सी. तसेच राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.





सदर रँडमायझेशन करतेवेळी १३- चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा अधिकारी विनय गौडा यांनी उपस्थित राजकीय पक्षांना, द्वितीय रँडमायझेशन नुसार विधानसभा मतदारसंघातील कोणत्या मतदान केंद्रावर कोणत्या क्रमांकाचे कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट आणि व्हीव्हीपॅट जाईल, याबाबत माहिती दिली. त्यानंतर सदर रँडमायझेशन राजकीय पक्षांच्या समक्ष करण्यात आले आणि जिल्ह्यासाठी प्राप्त झालेल्या ईव्हीएम, व्हीव्हीपॅट विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्येक मतदान केंद्रासाठी निश्चित झाल्या.चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात मतदान केंद्रांची संख्या २११८ असून यासाठी २६१० बॅलेट युनिट, २६१० कंट्रोल युनीट आणि २८१८ व्हीव्हीपॅट उपलब्ध झाल्या आहेत. यापैकी द्वितीय रँडमायझेशन नुसार राजूरा विधानसभा मतदारसंघातील ३३० मतदान केंद्रासाठी (बीयू - ४१२, सीयू - ४१२ आणि व्हीव्हीपॅट - ४४५), चंद्रपूर विधानसभा मतदारसंघातील ३८३ मतदान केंद्रासाठी (बीयू - ४७८, सीयू - ४७८ आणि व्हीव्हीपॅट - ५१७), बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील ३६१ मतदान केंद्रासाठी (बीयू - ४५१, सीयू - ४५१ आणि व्हीव्हीपॅट - ४८७), वरोरा विधानसभा मतदारसंघातील ३४० मतदान केंद्रासाठी (बीयू - ४२५, सीयू - ४२५ आणि व्हीव्हीपॅट - ४५५), वणी विधानसभा मतदारसंघातील ३३८ मतदान केंद्रासाठी (बीयू - ४०५, सीयू - ४०५ आणि व्हीव्हीपॅट - ४३९) आणि आर्णि विधानसभा मतदारसंघातील ३६६ मतदान केंद्रासाठी (बीयू - ४३९, सीयू - ४३९ आणि व्हीव्हीपॅट - ४७५) ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट निश्चित झाल्या आहेत.यावेळी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, संगणकीकरण आणि माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापन कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी सतिश खडसे उपस्थित होते.

# बाहेर पडणे टाळा; सूर्य आग ओकतोय!

**उन्हाळ्यातील कडक ऊन त्वचेसाठी खूप हानिकारक आहे. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे आपल्या त्वचेला सनबर्न, टॅनिंग आणि मुरुमांसारख्या समस्या उद्भवू लागतात. उन्हामुळे आपला चेहराही कोरडा आणि निर्जीव दिसू लागतो. यंदा सन २०२४साली खुप कडक उन्हाळा असण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. वाटते की सूर्यनारायण आग ओकत आहे की काय? त्यामुळे आपणच आपली काळजी घेणे इष्ट ठरणार आहे. खबरदारीचा इशारा देणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख सेवेत... संपादक.**

यावर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे.

उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमसमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि उष्माघात होतो. उष्माघात होण्याचे नेमके कारण म्हणजे शरीरातून बाहेर पडणाऱ्या उष्णतेहून शोषलेली उष्णता अधिक असते. यामुळे शरीराचे तापमान वाढते. उष्माघात झाल्यानंतर तातडीची



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

वैद्यकीय सेवा मिळाली नाही तर मृत्यू ओढवतो. उष्माघात आणि ताप येणे या भिन्न प्रक्रिया आहेत. ताप येण्यामध्ये शरीराचे तापमान नेहमीहून अधिक राहते. व्याख्येप्रमाणे उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान ३८.१ पेक्षा अधिक किंवा त्याहून अधिक तापमानाला स्थिर राहणे. सामान्यपणे दुपारी शरीराचे तापमान ३७.७० सेल्सिअस असते. उष्माघातामध्ये हे तापमान ४० सेल्सिअस होऊन ते जीवघेणे ठरते.

जास्त तापमानामुळे शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होतात. उष्माघात हा प्रामुख्याने अर्भकं, लहान मुलं, वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करणाऱ्यांमध्ये आढळतो. तसेच हृदयरोग, फुफ्फुसांचे



आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींनाही सहज उष्माघात होऊ शकतो. खेळाडूंना आणि बराच वेळ आउटडोअर काम करणाऱ्यांना उष्माघात होऊ शकतो. उष्माघाताची कारणे- अधिक प्रमाणात जंक फूड खाणे, आपल्याला घराबाहेर पडताच काहीतरी खायची इच्छा होते. उन्हात तर बाहेरचे अधिकच खात असतो. यामध्ये जंक फूडचे प्रमाणात अधिक असते. यामुळे उष्माघात आणि उष्मा, थकवा देखील होऊ शकतो. काही जंक फूडमध्ये मोनोसोडियम, ग्लूटामंट्ससह गरम आणि हानिकारक पदार्थ असतात. याचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढवते. ज्यामुळे शरीर उष्माघाताचा सामना करू शकत नाही. शरीरातील पाण्याचा अभाव हे उष्माघाताचे एक प्रमुख कारण समजले जाते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची अनेक प्रकरणे पाहिली जातात. भर उन्हात कमी पाणी पिऊन घराबाहेर पडले तर उष्माघात तर होईलच तसेच पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या अनेक रोगांचाही आपल्याला सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत नारळ पाण्याचे सेवन नक्की केले पाहिजे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने भर उन्हात बाहेर पडावेच लागते. सूर्याची तीव्र किरणे तोंड आणि शरीराच्या इतर भागांना स्पर्श करतात, तेव्हा उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. कामानिमित्त बाहेर निघाल्याने आपल्याला हे सर्व सोसावे लागते. उष्णता टाळण्यासाठी डोके, तोंड आणि हात हलक्या कपड्याने झाकून ठेवावे. शक्य असल्यास छत्रीसह घराबाहेर पडलेले बरे. आपणास थायरॉईडची समस्या असेल तर उन्हात उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. थायरॉईड असमतोल झाल्यावर रक्तदाब बदलल्यास थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत उन्हात जाणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे- उच्च ताप, कमी रक्तदाब, चक्कर येणे, उलट्या होणे, स्नायूंमध्ये कडकपणा, सतत घाम येणे, अशक्तपणा, त्वचेवर पुरळ, बेहोश होणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास समस्या, भीती आणि अस्वस्थता.

उष्माघातापासून बचाव असा करावा- उन्हात बाहेर निघणे टाळावे, उन्हात बाहेर पडताना छत्री वापरावी, उन्हाळ्यात चहा-कॉफी किंवा गरम पदार्थ टाळावे, शरीरात तापमान सामान्य राखण्यासाठी पाण्याची कमतरता येऊ देऊ नये, दिवसातून दोन ते तीन लीटर पाणी प्यावे, दीर्घकालीन काम टाळावे, उष्माघात झाल्यास डॉक्टरांना भेटावे, साखर असलेले पेय पिणे टाळावे, खुले व हलके कपडे घालावे, बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन आणि सनग्लासेस वापरावे, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावे, जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश असेल तेव्हा व्यायाम किंवा सायकल चालविणे टाळावे. अशाप्रकारे आग ओकणाऱ्या सूर्यनारायणाच्या प्रकोपापासून आपण वाचू शकतो. अन्यथा बळी पडू यात मुळीच शंका नाही!

!! रखरखीत उन्हाळ्याच्या सावधगिरीच्या इशाऱ्यासह हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# कैलासवासी नीलकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालयात वार्षिक उत्सव साजरा




**वरोरा । प्रतिनिधी**

स्थानिक कैलासवासी नीलकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालयात दिनांक ३ एप्रिल ला वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गुरुदेव जुमडे होते प्रमुख अतिथी म्हणून प्राध्यापिका सीमा बोभाटे व प्रणाली नरड या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य गुरुदेव जुमडे यांनी विद्यार्थ्यांना वार्षिक उत्सव दरम्यान मोलाचे मार्गदर्शन केले व येणाऱ्या परीक्षेबद्दल हार्दिक शुभेच्छा दिल्या. परीक्षेची तयारी कशी करावी याबद्दल ही मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथींनी सुद्धा विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी आपल्या वेगवेगळ्या कला सादर केल्या ज्यात गीत गायन, नृत्य यांचा समावेश आहे. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना भोजन देऊन पसायदानाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्राध्यापक पियुष लांडगे,प्राध्यापिका स्वाती चौधरी, दिव्या पेचे, इंदिरा निखाडे यांनी विशेष प्रयत्न केले कार्यक्रमाला विद्यार्थी उपस्थित होते.

## मला शिर्डीतून उमेदवारी द्यायला फडणवीस तयार होते

# पण सीएम शिंदेंना अडचण होती,म्हणून उमेदवारी नाही-रामदास आठवले

**डोंबिवली-**मला यंदा शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यासाठी देवेंद्र फडणवीस तयार होते. किंबहुना ते माझ्या उमेदवारीसाठी आग्रही होते. फडणवीसांनी त्यादृष्टीने प्रयत्नही केले. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अडचण असल्याने मला शिर्डीची उमेदवारी मिळू शकली नाही, असे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे.



दरम्यान केंद्रीय मंत्री रामदास आठवले पुढे बोलताना म्हणाले की, मला शिर्डीतून लोकसभा निवडणूक लढण्याची इच्छा होती. २००९ साली लोकसभेच्या निवडणुकीत शिर्डीतून माझा पराभव झाला होता. यंदा आरपीआय पक्षाला लोकसभेची किमान एक जागा मिळावी, असा आमचा आग्रह होता. मात्र, तसे होऊ शकले नाही. परंतु, देवेंद्र फडणवीस यांनी मला आश्वासन दिले आहे की, २०२६ मध्ये माझा राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर रिपाईबाबत विचार केला जाईल. केंद्रात रिपाईला कॅबिनेट मंत्रीपद मिळवून देण्यासाठीही देवेंद्र फडणवीस प्रयत्न करणार आहेत.डोंबिवलीतील एका कार्यक्रमात बोलताना रामदास आठवले यांनी शिर्डीच्या जागेविषयी गौप्यस्फोट केला.

रामदास आठवले म्हणाले की, देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही. ते बदलणार अशा अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र, मी त्याठिकाणी मंत्रिमंडळात आहे. मी संविधानाला अजिबात हात लावून देणार नाही. राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर मंत्रिमंडळ विस्तार होईल तेव्हा रिपाईला मंत्रिपद देण्यात येईल. याशिवाय, महामंडळाची दोन चेअरमन पदे, जिल्हा कमिटीमध्ये रिपाईला प्राधान्य दिले जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सांगण्यात आल्याची माहिती रामदास आठवले यांनी दिली.रामदास आठवले म्हणाले की, राज्य मंत्रिमंडळ होणाऱ्या विस्तारात देखील आरपीआयला जागा दिली जाईल असे देखील आश्वासन दिल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. महायुतीच्या कार्यक्रमांमध्ये आरपीआयचा झेंडा दिसत नाही, याबद्दल थोडी नाराजी होती. मात्र येथून पुढे आरपीआयला सन्मान दिला जाईल, असा आश्वासन फडणवीस यांनी दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कालखंडात बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक स्मारकांचे काम केले. त्याचप्रमाणे इंदूमिल येथील स्मारकाचे काम देखील सुरू आहे. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाने भाजपसोबत राहण्याचा निर्णय घेतलाय. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होतील, असा विश्वास यावेळी रामदास आठवले यांनी बोलून दाखवला.

# आदिवासींच्या विकासाकरीता एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दिशादर्शकर

## लोकसहभागातून ग्रामसभांचा विकास व सक्षमीकरण

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावणे तसेच आदिवासींचा शाश्वत विकासाकरीता गौण वन उपजांवर आधारित रोजगार निर्मिती करून लोकसहभागातून ग्रामसभांचा विकास व सक्षमीकरण करण्याकरीता गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने एकल: ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

ग्रामसभास्तरावर आदिवासींकरीता शाश्वत उपजीविका निर्माण करणे, जैवविविधता संवर्धनासाठी धोरणांची अंमलबजावणी करणे, वनसंरक्षण, वनसंवर्धन व वन व्यवस्थापन योजनांच्या अंमलबजावणी करीता ग्रामसभांची क्षमता वाढविणे तसेच ग्रामसभांना तांत्रिक सहाय्य करून वनसंवर्धन व वन व्यवस्थापन योजनांचा विकास व अंमलबजावणी करणे हा एकल ग्रामसभा प्रकल्पाचा उद्देश आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे आणि तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना यांच्या संकल्पनेतून एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना अस्तित्वात आली. सदर संकल्पना प्रत्यक्षात उतरविणे, उद्देशांची पूर्तता करणे व ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरीता जिल्हा प्रशासनाने गोंडवाना विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला. या करारानुसार गोंडवाना विद्यापीठ नॉलेज पार्टनर म्हणून भूमिका पार पाडत आहे. ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनात, विद्यापीठांतर्गत ग्रामसभा सक्षमीकरण व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. येथील आदिवासींच्या विकासाकरीता एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दिशादर्शक ठरणारे आहे.

वनहक्क कायद्यांतर्गत जिल्ह्यातील एकूण १ हजार १०९ गावांना सामूहिक वनहक्क दावे प्राप्त झाले आहेत. जिल्हा प्रशासनासोबत ६४३ ग्रामसभांचा सामंजस्य करार झाला असून आतापर्यंत एकूण ३६७ ग्रामसभांना तर एकूण १ हजार ८१० ग्रामसभा प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. २१८ सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांची नरेगा पोर्टलवर अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. तर ६२ ग्रामसभेमध्ये नरेगा व मानव विकास योजनेअंतर्गत वनोपजाच्या साठवणुकीकरीता गोडावून उभारणे प्रस्तावित आहे. तसेच सामूहिक वनहक्क प्राप्त ५३ ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे बनविण्याकरीता मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामसभा सक्षमीकरणाकरीता गोंडवाना विद्यापीठामार्फत ५८ प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. तसेच १३५ ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे जिल्हा कन्वर्जन्स समितीकडे सादर करण्यात आले आहे. जिल्हा परिवर्तन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली अंतर्गत ३ एकल सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहेत, हे या प्रकल्पाचे फलित आहे.



**श्री.सुधीर आत्राम**
**जनसंपर्क अधिकारी**
**गोंडवाना**
**विद्यापीठ,गडचिरोली**

ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ग्रामसभांचे क्षमता सक्षमीकरण व विकास साधण्याकरीता तसेच ग्रामसभांना प्रशिक्षण देण्याकरीता अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा क्षमता सक्षमीकरण अभ्यास मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे.

**अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी अभ्यासगटांची निर्मिती:**

अभ्यास मंडळाची निर्मिती केल्यानंतर अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी सहा अभ्यास गट तयार करण्यात आले आहे. सदर अभ्यास गटामध्ये आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायद्यांचा अभ्यास करणारा अभ्यास गट, या अभ्यास गटात भारतीय वन अधिनियम १९२७, पंचायत राज अधिनियम १९५८, महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४, भूराजस्व संहिता १९६६ प्रमाणे निस्तार हक्क, मनरेगा (१९७६ ते २००५), पेसा कायदा १९९६, जैवविविधता कायदा २००२ ते २००४, सामूहिक वनहक्क कायदा २००६, इत्यादी कायद्यांचा समावेश आहे.

ग्रामसभांचे रेकॉर्ड, हिशोब व अंकेक्षण अभ्यास करणारा गट यामध्ये ग्रामसभाचे रेकॉर्ड व अंकेक्षण तयार केल्या जातात. ग्रामसभेतील संघर्ष निराकरणाचा अभ्यास करणारा गट यामध्ये, ग्रामसभांमध्ये संघर्ष निर्मितीची कारणे तपासणे, ग्रामसभा व शासकीय यंत्रणेतील संघर्ष तसेच वाद निराकरणाचे उपाय यावर अभ्यास केल्या जाते. लागवड, संकलन, साठवणूक, प्रक्रिया व गुणवत्ता नियंत्रणाचा अभ्यास करणारा गट, आणि पाणलोट क्षेत्र आधारित गाव विकासाचा अभ्यास करणारा गट असे विविध गट तयार करण्यात आले आहे.

**एकल: ग्रामसभा प्रशिक्षणाकरीता ग्रामसभांची निवड:**

एकल ग्रामसभा प्रशिक्षणाकरिता ग्रामसभांची निवड जिल्हा प्रशासनाकडून केली जाते. ज्या ग्रामसभांनी जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार केला आहे, अशा ग्रामसभांची निवड प्रशिक्षणाकरिता केली जाते. एका ग्रामसभेतून ग्रामसभेचे अध्यक्ष, सचिव, दोन महिला व एक ग्रामसभा सदस्य अशा एकूण ५ ग्रामसभा सदस्यांची निवड ग्रामसभेद्वारे ग्रामसभेत ठराव घेऊन केली जाते. तसेच निवड झालेल्या ग्रामसभा सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाते. एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दोन टप्प्यात राबविले जाते. पहिल्या सात दिवसाच्या निवासी प्रशिक्षणात ३ दिवस आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायदे त्यामध्ये, पेसा कायदा, सामूहिक वन हक्क कायदा, जैवविविधता कायदा, रोजगार हमी कायदा आदी कायद्यांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर २ दिवस वनव्यवस्थापन आराखडा तयार करण्याबाबतचे प्रशिक्षण तर शेवटच्या २ दिवसांमध्ये गौण वनउपज, संकलन व व्यवस्थापन आणि ग्रामसभेशी संबंधित रेकॉर्ड व अंकेक्षण याबाबतचे प्रशिक्षण दिले जाते.

एकल ग्रामसभा प्रशिक्षणाच्या सुरवातीला प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता ४ ते ५ ट्रेनर होते. यामध्ये, डॉ. देवाजी तोफा, डॉ.मोहन हिराबाई हिरालाल, डॉ. सतीश गोगुलवार, श्री. केशव गुरनुले, डॉ. रुपेंद्रकुमार गौर, डॉ.कुदंन दुपारे आदी मास्टर ट्रेनर होते. त्यासोबतच, ग्रामसभांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा मधून सहयोगी मित्र म्हणून १२९ तरुण-तरुणींची निवड करण्यात असून यामध्ये आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायदे, वन व्यवस्थापन, जैवविविधता, गौण वनउपज संकलन, विपणन, वन व्यवस्थापन आराखडा, ग्रामसभांचे अंकेक्षण व रेकॉर्ड आदींचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा रोजगार हमी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी करून रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारी कामे ग्रामसभेला मिळतात, त्यामुळे रोजगारासाठी होणारे स्थलांतरण कमी झाले आहे. सोबतच पुढील दहा वर्षाकरीता वनव्यवस्थापन व संरक्षण आराखडा सहयोगी मित्रांच्या मदतीने ग्रामसभा तयार करून जिल्हा कन्वर्जन्स समितीकडे सादर करतात. त्यामुळे ग्रामसभेला मिळालेल्या सामूहिक वनहक्कांचे व जंगलाचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होत आहे.

आदिवासी भागांसाठी पेसा, सामूहिक वन हक्क यासारख्या कायद्याची निर्मिती झाली. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे आदिवासींसाठी बनलेल्या कायद्यांची जाणीवजागृती झाल्यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होत आहे.

**एकल सेंटर अंतर्गत विविध टप्प्यात प्रकल्पाची अंमलबजावणी:**

ग्रामसभांना जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार करून जोडणे. गोंडवाना विद्यापीठाच्या सहाय्याने सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे कायदा, व्यवस्थापन, लेखेजोखे याबाबत प्रशिक्षण देणे. सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे बनविण्याकरीता मार्गदर्शन करणे. ग्रामसभांच्या सक्षमीकरणाकरीता तसेच त्यांच्या गौण वनोपजांना प्रक्रिया व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरीता मदत करणे. गौण वनोपजाच्या साठवणुकीकरीता ग्रामसभेमार्फत गोडाऊन उभारणे. सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांना नरेगा अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी आणि कामाचे नियोजन करणे. विविध शासकीय योजनांना एक केंद्रित करून ग्रामसभांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आदी टप्प्यांमध्ये एकल सेंटर अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येते.

# सविता महादेव कोळसे पाटील यांना अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

**सांगोला । प्रतिनिधी**




पुलंच्या एका संग्रहातील ओळी आहेत-- विश्व निर्माण करणं म्हणजे ...नातीगोती जपणं.. छंद जोपासणं...पाहुणे होऊन जाणं... खूप गप्पा मारणं... घराच्या उंबऱ्यात चपलांचा ढीग असणं... खळखळून हसणं... काळजातील दुःख सांगून मोकळेपणा रडणं... या गोष्टी प्राप्त करून घेणारी व्यक्ती... म्हणजे शून्यातून विश्व निर्माण करणारी व्यक्ती अशा शून्यातून स्वतः मानसिक सामाजिक विश्व निर्माण करणाऱ्या सोनंद गावच्या बचत गट प्रवर्तक कार्यकर्त्या सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य श्री महादेव दिगंबर कोळसे पाटील यांच्या सुविद्य पत्नी सौ सविता महादेव कोळसे पाटील. यांना नुकताच अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला. दिनांक २९ मार्च रोजी वितरण सोहळा सोलापूर येथे पार पडला .प्रबळ इच्छाशक्ती व कष्टाची तयारी असेल तर प्रत्येकीला यश प्राप्त होते पूर्वाश्रमीच्या कुमारी सविता व्यंकटराव पाटील हिप्पळगावकर त्यांचे वडील शिक्षक यांच्याकडून त्यांना समाजकार्याचा वारसा लाभला. गावात रात्र शाळा चालवणे, सगळ्यांना शिक्षित करणे, वाचनालय काढून घरोघरी महिलांना पुस्तके देऊन वाचनाची आवड निर्माण करणे, ग्राम स्वच्छता, पिण्याचे पाणी देणे या त्यांच्या कार्याचा वारसा त्यांनी आपल्या मुलीला दिला व सौ सविता यांनी तो चालू ठेवला आहे.परिसरातील महिलांसाठी त्यांच्या विकासासाठी त्यांनी तो पुढे चालवला आहे .गेली २५ वर्ष त्यांनी बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांचे छोटे व्यवसाय शेतीच्या कामासाठी घर बांधणी पासून मशीन देणे मुलांच्या फी पासून ते लग्न खर्चापर्यंत पैसे उपलब्ध करून त्यांचे आयुष्य सुखकर केले आहे.त्यांच्या प्रापंचिक चिंता मिटवण्यास हातभार लावला आहे हे करताना त्यांनी कधी थकबाकी मोजायची सोडली तर कधी सावकारी व्याज चढवले नाही.स्वयंशिस्त व रोखठोक बोलण्याने गटातील व्यवहार अबाधित ठेवून सोबत प्रेमाचा बचतीचा ,हातभाराचा सहकार्याचा सल्ला देऊन महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.आरोग्यविषयक जागृती मनोरंजन अनेक समारंभ केले. चालू वर्षीच त्यांना माता बालक प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा जिद्द पुरस्कार देऊनही प्रतिष्ठानने त्यांचा सन्मान केला. सोनंद ग्रामपंचायत तर्फे ही सरपंच श्री समाधान पाटील व सर्व सदस्यांनी त्यांना अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित केले आहे. जिंकल्यावर शाब्बासकी देणाऱ्या हातांच्या गर्दी पेक्षा खेळात उतरताना अगोदर विश्वासाने पाठीवर ठेवलेला हात किमती असतो. त्यांचे यजमान श्री महादेव कोळसे पाटील यांचाही हात व मोठे सहकार्य त्यांच्या या कार्यात आहे. नाते सन्मानित करणारेअसावे .प्रेरणा देणारे असावे. बळ देणारे साथ देणारे असावे. स्वार्थ पाहणारे नसावे असे आचरण व कृतीतून त्यांनी दाखवून दिले व समस्त महिलांपुढे एक आदर्श घालून दिला त्याबद्दल त्यांचे मनस्वी अभिनंदन करावेसे वाटते. त्या उच्चशिक्षित आहेत धन्वंतरी म्हणजेच आरोग्य देवता त्यांच्यावर इतकी प्रसन्न नाही. परंतु ,आरोग्य संपन्न नसल्याची कसलीही खंत त्यांच्या व्यक्तित्वात कधी दिसली नाही. म्हणून त्यांच्यासाठी काही कवी विंदा करंदीकर च्या ओळी आठवतात ...विंदा लिहितात.. आयुष्याला द्यावे उत्तर ..नको गुलामी नक्षत्रांची ,भीती आंधळी ताऱ्यांची, आयुष्याला भिडतानाही चैन करावी स्वप्नांची.. त्यांच्या साऱ्या स्वप्नांना गगनभरारी लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना! व त्यांच्या कार्य व सन्मानाला मनःपूर्वक आभाळभर शुभेच्छा ! अभिवादन ! या अभिवादनाबरोबरच सोनंद व परिसरातील सर्व महिलांना माझे मनःपूर्वक आवाहन आहे आपणही बचत गटांमध्ये सामील होऊन स्वतःचे व्यक्तिमत्व , संसार फुलविण्यास सिद्ध व्हावे प्राचार्या श्रीमती संगीता दत्तात्रय शेडसाळे. सावित्रीबाई फुले प्रशाला व ज्युनियर कॉलेज सोनंद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर

# पक्ष वेगळे असले तरी समाज म्हणून आपण एकत्र असले पाहिजे-केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले

## तरुणांच्या मनात क्रांतीची ज्योत पेटविणारे शहीद भाई संगारे यांचे महाड मध्ये स्मारक उभारण्यासाठी प्रयत्न करूया

**मुंबई । प्रतिनिधी**

ज्यांच्या शब्दाशब्दांत असायचे अंगारे ,ते होते भाई संगारे अशी काव्यमय सुरुवात करून तरुणांच्या मानत क्रांति ची ज्योत पटविणारे शहीद भाई संगारे यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाड क्रंतिभुमित त्यांचे स्मारक उभारण्यासाठी आपण सर्व जण प्रयत्न करुया; शहीद भाई संगारे यांच्या २५ व्या स्मृतिदिनी आज सर्व जुने पँथर एकत्र आले आहेत. आपले आता पक्ष वेगवेगळे असले तरी समाज म्हणून आपण नेहमी एकत्र असले पाहिजे अशी सामाजिक ऐक्याची साद घालत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी दिवंगत शहीद भाई संगारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.



भायखळा येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह येथे दिवंगत शहीद भाई संगारे यांच्या २५ व्या स्मृतिदिनी आयोजित जाहीर श्रद्धांजली सभेत ना. रामदास आठवले बोलत होते.यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ज्येष्ठ पँथर नेते अविनाश महातेकर आणि सर्व दलित पँथर चळवळीतील जुने नेते उपस्थित होते. त्यात ज्येष्ठ नेते पँथर ज वी पवार ; अर्जुन डांगळे; गौतम सोनवणे; खासदार चंद्रकांत हंडोरे, तानसेन ननावरे; सुरेश बारशींग ; दीलिपदादा जगताप, सिद्धार्थ कासारे, विवेक पवार

सूनील खांबे आशाताई लांडगे, संजय पवार, रवी गरुड ' गोपी मोरे, अनिकेत संसारे,चंदू जगताप, आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शहीद भाई संगारे यांच्या पत्नी सुषमाताई संगारे, मुलगी वैशाली संगारे लाड; मुलगा राहुल संगारे ; चारूदत्त संगारे, जावई संदीप लाड आदी परिजण उपस्थित होते.

यावेळी विधान सभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर सुद्धा उपस्थित होते त्यांनी दिवंगत शहीद भाई संगारे यांना श्रद्धांजली वाहणारे भाषण सभेच्या प्रारंभीच केले. यावेळी ज्येष्ठ पँथर नेते तानसेन ननावरे यांनी दिवंगत शहीद भाई संगारे यांचे क्रांति भूमी महाड येथे स्मारक करावे अशी मागणी केली. यावेळी सर्वच वक्त्यांनी या मागणीला पाठिंबा दिला.यावेळी सभागृहात अनेक आंबेडकरी चळवळीतील पँथर कार्यकर्ते उपस्थित होते. दलित पँथर आणि नंतर भारतीय दलित पँथर च्या चळवळीतील अनेक आठवणींना उजाळा देत शहीद भाई संगारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी सभागृह दलित पँथर चळवळीच्या आठवणींनी पँथरमय झाले होते.यावेळी पँथर रतन अस्वारे , धम्मु आगरकर, शिरीष चिखलकर आदी अनेक मान्यवर उपस्थीत होते.

# आणीबाणी सारखी परिस्थिती देशात निर्माण झाली-खा.सुळे

**पुणे**-सर्वाच्च न्यायालय आयकर विभाग, ईडी, सीबीआय यांचा गैरवापर तसेच निवडणुकीची प्रक्रिया यावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ही बाब नागरिकांसाठी वेदनादायी व चिंताजनक आहे. आणीबाणी देशात लागू नाही परंतु तशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा दबक्या आवाजात समाजात सुरु आहे. ही बाब लोकशाही देशासाठी घातक विषय आहे. दडपशाहीच्या दिशेने पाऊले टाकली जातात का? अशी सातत्याने काळजी सरकार घेत असलेल्या काही निर्णयातून होत आहे. देशाचे संविधानासाठी ही चिंताजनक बाब असून त्याच्या विरोधात आमची लढाई आहे असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले आहे.सुळे म्हणाल्या, बारामती लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने मला पाठिंबा दिला त्याबद्दल मी सदर पक्ष व पक्षाचे प्रमुख अॅड.प्रकाश आंबेडकर यांची आभारी आहे. महाविकास आघाडी मधील पक्षात अद्याप राज्यातील उमेदवारीबाबत चर्चा सुरु आहे. देशातील हुकमशाही, दडपशाही हद्दपार करण्यासाठीची ही लढाई आहे. त्यामुळे राज्याच्या, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ही लढाई आहे, त्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहे.शिवसेना उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी ईव्हीवर निवडणुक घेण्याऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुक घेण्याची मागणी



केली याबाबत सुळे म्हणाल्या,कोणतीही निवडणुक ही पारदर्शक झाली पाहिजे, कोणती दडपशाही, दमदाटी न करता निवडणुक प्रक्रिया पार पडणे महत्वाचे आहे. जे मतदारराजाच्या मनात आहे तशाप्रकारे निवडणुक झाली पाहिजे. सर्वाच्च न्यायालयाने देशाचे हित पाहिले नेहमी पाहिलेले आहे. देशात कॉपी करुन पास होण्यात काय मजा आहे. मेहनत करुन देशाची सेवा करण्यासाठी आम्ही राजकारणात येत नाही. कॉपी करुन पास होण्यासाठी आम्ही राजकारणात येत नाही. समाजात सातत्याने अस्वस्थता दिसत आहे. लोकांना सतत धमक्या येत आहे ही चुकीची बाब आहे.

# आता काँग्रेसच्या कोणत्याही बैठकीला हजर राहणार नाही

## विश्वजित कदमांचा टोकाचा निर्णय

**मुंबई**-सांगली लोकसभेवरून महाविकास आघाडीमध्ये मोठी वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. त्याची सुरूवात देखील पाहायला मिळत आहे. सांगलीची जागा ही काँग्रेसलाच मिळावी आणि त्यासाठी टोकाची भूमिका घ्यावी लागली तरी चालेल असे म्हणत आमदार विश्वजीत कदम यांनी आता खरोखरच टोकाची भूमिका घेत पाऊले उचलले आहे.जोपर्यंत सांगलीचा तिढा सुटत नाही तोपर्यंत आपण काँग्रेसच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहणार नसल्याचं विश्वजित कदम यांनी पत्राद्वारे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना कळवले आहे. कारण ठाकरे गटाने सांगलीमधून चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केलेली आहे. त्याला स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा विरोध आहे. त्यामुळे कदम देखील आक्रमक झाले आहेत. आमदार विश्वजित कदम यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना तशा आशयाचं एक पत्र लिहिलं आहे. सांगलीच्या जागेबद्दल आपल्या भावना काय आहेत हे तुम्ही जाणता, त्यामुळे महाविकास आघाडीकडून सांगलीच्या जागेचा तिढा सुटत नाही तोपर्यंत आपण पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहणार नाही असं विश्वजित कदम म्हणाले. त्यामुळे कदम यांच्या भूमिकेमुळे राज्यात व विशेषकरून महाविकास आघाडीमध्ये काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.राज्यात आगामी लोकसभा निवडणूक ही काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडी म्हणून आपण सर्वजण ताकदीने लढवणारच आहोत. माझी आणि सांगलीतील



काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांची सांगली लोकसभेच्या जागेबाबतील असणारी भावना आपण जाणत आहात. गेल्या काही दिवसांपासून सांगली आणि राज्यातील इतर काही लोकसभेच्या जागांचा तिढा अद्यापही सुटलेला नाही. काँग्रेस पक्ष सांगली लोकसभेची जागा लढवण्यास सक्षम आहे या भूमिकेवरती मी आणि सांगली जिल्ह्याती कार्यकर्ते आजही ठाम आहोत. तसेच अद्यापही सांगली लोकसभा जागेबाबतील काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीने आम्हाला कोणताही निर्णय कळवलेला नाही. त्यामुळे जोपर्यंत सांगली लोकसभेच्या जागेचा तिढा सुटत नाही, तोपर्यंत सांगली जिल्ह्यातील पक्षाचा कार्यकर्ता आणि आमदार म्हणून मी पक्षाच्या बैठकीस अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतला आहे.

## व्यापारी असोसिएशनचा बीट बंदचा बहिष्कार मागे

# आ.सौ.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून सेलू कृषी उत्पन्न बाजार समिती कापूस यार्डातील बीट पूर्वत सुरू

**सेलू । प्रतिनिधी**

ही बैठक घडून आणण्यासाठी भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्ष तसेच संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू ऍडव्होकेट दत्तराव नारायणराव कदम डॉक्टर संजय दादा रोडगे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू यांनी विशेष प्रयत्न केले यावेळी त्यांचे व्यापारी असोसिएशनने कौतुकही केले.

शेतकरी बांधवांचे हित हे सर्वप्रथम असुन शेतकऱ्यांच्या माल आणि व्यावहारमुळे बाजार समिति आणि व्यापार चालतो त्यामुळेत त्यांना प्राधान्य दिले पाहिजे असे मत आमदार साहेबांनी व्यक्त केले.

गेल्या पंचवीस दिवसापासून कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू कापूस यार्डातील बीट हे बंद होते. दरम्यानच्या काळामध्ये मासिक सभेत सभापती व व्यापारी संचालक यांच्यातील मारहाण,तसेच व्यापारी संचालकांना चोर आहेत असे अपशब्द वापरले गेले यामुळे व्यापारी असोसिएशनने जोपर्यंत संबंधित संचालक माफी मागत नाही तोपर्यंत आम्ही कापूस यार्डतील बीटा



वर बहिष्कार टाकतो असे पत्र दिले. तेव्हापासून आजपर्यंत बऱ्याच बैठका झाल्या,बऱ्याच चर्चा झाल्या,पण विश्वासहार्यतेच्या अभावा मुळे पर्याय निघाला नाही. सेलू तालुक्यातील शेतकरी वर्गाची होणारी हेळसांड,तसेच व्यापारी वर्गात पसरलेली नाराजी आणि भीती दूर करण्यासाठी व सेलुतिल बाजारपेठ आणि व्यापार सुरुलित करण्याच्या हेतुने तालुक्याच्या आमदार सौ मेघना दीदी यांनी मध्यस्थी करत सन्मान जनक पर्याय काढला. तसेच एकेकाळी सेलू बाजारपेठ कापसासाठी प्रसिद्ध असून आपल्या शहरातील कापूस व्यापार हा वाढला पाहिजे,तसेच शेतकरी, व्यापारी आणि बाजार समिति मधे तनाव न होता समन्वय वाढला पाहिजे असे मत व्यक्त केले .सेलू ही कापसाची मुख्य बाजारपेठ असून येथे मराठवाड्याच्या सर्व दूर भागातून कापूस विक्रीसाठी येत असतो हे वैभव दरम्यानच्या वादामुळे लोप पावत होते. याची दखल घेत आमदार मेघनाथ दीदी यांनी पुढाकार घेऊन व्यापारी यांची बैठक घेऊन अडचणी विचारल्या त्यांना विश्वास दिला व सन्मान जनक पर्याय काढला. यावर व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी आणि सदस्य व तसेच सेलू इंडस्ट्रियल ओनर्स असोसिएशन चे पदाधिकारी व सदस्य यांनी सकारात्मक होकार दर्शवला व उद्यापासून दी ३ मार्च पासून बीट पूर्ववत सुरू करण्यास होकार दिला. बैठकीसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक माऊली ताठे,अनिलराव पवार, अजय भैय्या डासाळकर, केशवराव सोळुंके, भास्कर आबा पडघन ,रामेश्वरजी राठी, शैलेजी तोष्णीवाल उपस्थित होते.या बैठकीसाठी व्यापारी असोसिएशन चे प्रभूदयालजी मंत्री,सुरेंद्रजि,निर्मल भाई, आशिष विनायके,अविनाश बिहानी, ब्रिज गोपालजी काबरा,नारायणजी शर्मा, नबाराम जी पवार, अमोलजी दायमा उपस्थित होते तसेच सहाय्यक निबंधक श्री तायडे साहेब राठोड साहेब आणि मार्केट कमिटी सचिव राजीव वाघ हे देखील बाजार समिति बैठक मध्ये उपस्थित होते.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील व्यवसाय ठप्प

**पंढरपूर** – श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिराचे जीर्णोद्धार व संवर्धनाचे काम सुरू असल्याने, मागील १५ मार्चपासून श्री विठ्ठल- रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन बंद आहे. पदस्पर्श दर्शन बंद असल्याने श्री विठ्ठल दर्शनासाठी पंढरीत येणाऱ्या भाविकांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. परिणामी मंदिर परिसरातील विविध व्यवसाय ठप्प झाले असून, त्याचा परिणाम थेट अर्थकारणावर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निधीतून पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या संवर्धनाचे व जीर्णोद्धाराचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. मंदिर संवर्धनाच्या कामासाठी मागील १५ मार्चपासून श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे पदस्पर्श दर्शन बंद करण्यात आले असून, पहाटे पाच ते सकाळी ११ या वेळेत केवळ मुखदर्शन सुरू आहे. त्यामुळे भाविकांची संख्या कमालीची रोडावली आहे.त्याचा थेट परिणाम प्रासादिक वस्तू, उदबत्ती, चुरमुरे, बत्तासे, तुळशीहार, फुले, पेढा, मेवा मिठाई यासह इतर साहित्य विक्री करणाऱ्या छोट्या- मोठ्या दुकानदारांच्या व्यवसायावर झाला आहे. श्री विठ्ठल दर्शनासाठी दररोज येणाऱ्या भाविकांच्या संख्येवर व आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या चार प्रमुख यात्रांवर पंढरपूरचे अर्थकारण अवलंबून आहे.कोरोनानंतर दररोज सुमारे ३० ते ४० हजार भाविकांची पंढरीत गर्दी होत आहे. या भाविकांमुळेच पंढरीतील प्रासादिक वस्तूंची विक्री करणारे छोटे- मोठे व्यावसायिक व लॉज, हॉटेल व्यवसायात मोठी उलाढाल होते. तर टांगेवाले, रिक्षावाले, हारफुलांची विक्री करणारे, पेरू विक्रेते, चंद्रभागा नदीमध्ये होडी चालवणारे कोळी बांधव यांना रोजगार उपलब्ध होतो.मात्र मागील पंधरा दिवसांपासून या रोजगाराला जबर फटका बसला आहे. मंदिर परिसरातील सुमारे अडीचशे ते तीनशे छोट्या- मोठ्या व्यावसायिकांचा व्यवसाय ठप्प झाला आहे. अजून किमान एक महिना तरी पदस्पर्श दर्शन बंद राहणार असल्याने या व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



# नागभीड येथे काँग्रेसच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन व सभेचे आयोजन

## विरोधकांना संपवून हुकूमशाही आणण्याचा भाजपचा डाव-विजय वडेट्टीवार

**चिमूर । प्रतिनिधी**

देशांतील प्रत्येक नागरिकांला समान हक्क व जगण्याचा अधिकार मिळावा, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही पुरस्कृत संविधान लिहून देशाला उत्तम घटना दिली. मात्र सध्याच्या केंद्रातील मनुस्मृति विचारांचे सरकारने देशांतील नागरिकांची लूट करुन, धर्मांधतेच्या नावावर दिशाभूल करीत व्यापारी हित जोपासून देशाच्या नागरिकांचे रक्षण कवच असलेल्या पवित्र संविधान पूर्णतः बदलण्याचा प्रयत्न चालविला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला रोखले नाही तर स्वतंत्र भारतात गुलाम म्हणुन जगावे लागेल. हि अंतीम निवडणुक समजून हुकूमशाही आणू पाहणाऱ्या भाजपा सरकारला सत्तेतून हद्दपार करा असे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. ते गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांचे प्रचारार्थ नागभीड येथे आयोजीत सभेत बोलत होते.



आयोजीत प्रचार सभेस प्रमूख अतिथी म्हणून माजी आमदार डॉ. अविनाश वारजुरकर , इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ नामदेव किरसान, माजी जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव गावंडे, काँग्रेस अनु. जाती सेल जिल्हाध्यक्ष प्रफुल खापर्डे, हसन गिलानी,,काँग्रेसचे चिमूर विधानसभा समन्वयक डॉ.सतीश वारजुकर, ओबीसी प्रदेश संघटक धनराज मुंगले, ड.प्रफुल खापर्डे,गोविंद भेंडारकर, नरेंद्र हेमने, डॉ. कावळे , प्रमोद चौधरी, मंगेश सोणकुसरे, भास्कर शिंदे, डॉ. रघुनाथ बोरकर, विनोद बोरकर, खोजराम मरस्कोल्हे, शरद सोनवाने, किशोर समर्थ, साईश वारजुकर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

पुढें बोलतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, देशांतील शेतकरी, कामगार, युवक नोकरदार वर्ग व सर्व नागरीक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. महागाई, बेरोजगारी, खाजगीकरण यामुळे अगोदरच जनतेचे कंबरडे मोडले असुन आता विरोध करणाऱ्या विरोधकांना संपविण्याचा डाव आखला जात आहे. खते, जीवनावश्यक वस्तू, पेट्रोल, डिझेल, गॅस यात प्रचंड दरवाढ व जीएसटी च्या माध्यमातून जनतेची लूट केल्या जात आहे. अश्या निष्ठूर सरकार विरुद्ध आता पेटून उठून देशातील संविधान टिकविण्यासाठी इंडिया आघाडीच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. देश सुरक्षित नाही, देशांतील महीला सुरक्षित नाही, महीला खेळाळूचे शोषण करणारे मोकाट फिरत आहे. अशी अवस्था देशाची झाली आहे. तर विद्यमान खासदार अशोक नेते हे संसदेत मौन धारण करून बसतात अश्या मौनी बाबाला उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार देतात हि हास्यास्पद बाब असल्याची टीका विरोध पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली. तर देशातील भाजप सरकार हे आदिवासी, शेतकरी, कामगार, युवक विरोधी सरकार असुन देशाच्या शेतकऱ्यांना आजवर हमीभाव दिला नाही. देशांत तानाशाही सुरु असुन पक्ष फोडल्या जात असल्याचे माजी आ. डॉ. अविनाश वारजुरकर यांनी यावेळी सांगितले. देशात सत्तापीपासून् बहुजनांना धर्म जातीमध्ये विभागून तसेच स्वतःचा पराभव दिसताना पुलवामा सारखे कांड घडवून निष्पाप सैनिकांचा बळी घेतल्याचे व त्यातून सत्ता काबीज केल्याचे पाप केले गेले आहे. अशा निष्ठूर सरकारला हद्दपार करण्यासाठी मला सेवेची संधी द्यावी, असे प्रतिपादन इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांनी केले. तत्पूर्वी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते गडचिरोली - चिमूर लोकसभेचे इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव कीरसान यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी नागभिड तालुक्यांतील व परिसरातील हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

# २० एप्रिल पासून आनंद निकेतन महाविद्यालयात ५ वे उन्हाळी क्रीडा व योग प्रशिक्षण शिबिर

**आनंदवन । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या सुट्ट्या म्हणजे मामाच गाव, कैऱ्या, आंब्याची मज्या एवढेच समीकरण मर्यादित नसून आता काळानुरूप यात उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराची भर पडली आहे.खेळांच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास, धाडसीप्रवृत्ती निर्माण करणे, आणि इंटरनेट व मोबाईल च्या आभासी जगातून बाहेर काढून क्रीडागुणाना वाव देण्याची हिच खरी वेळ असते .



तर दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा ५ वे उन्हाळी योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिर २०२४ चे आयोजन महारोगी सेवा समिती, वरोरा संचालित आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे दिनांक २० एप्रिल ते १० मे २०२४ दरम्यान होत आहे.

या क्रीडा प्रशिक्षण शिबिरात वय वर्ष ५ ते वय वर्ष ७५ गटातील मुले व मुली तसेच महिला व पुरुष यांना देशी व विदेशी अश्या २८ विविध खेळांचे प्रशिक्षण राष्ट्रीय स्तरावरील माजी खेळाडू व प्रशिक्षकांमार्फत दिल्या जाते. ज्यात मल्लखांब, कबड्डी , खो खो, योग, कराटे, तायकाँडो, बॉक्सिंग, आर्चरी, वुशू, बास्केटबॉल, हँडबॉल, वॉलीबॉल, बुद्धिबळ, नेटबॉल, बॉल बॅडमिंटन, सेपक टकरा, टेबल टेनिस, सॉफ्टबॉल, फुटबॉल, एथलेटिक्स, क्रिकेट, लॉन टेनिस, स्केटिंग, तलवारबाजी, वेटलिफ्टिंग, किक बॉक्सिंग, एरियल सिल्क इत्यादी खेळांचे प्रशिक्षण सकाळी ६ ते ८ व सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत दिले जाते. क्रीडा प्रशिक्षण शिबिराकरिता दिनांक १ एप्रिल ते १० एप्रिल २०२४ दरम्यान शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन, वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे प्रवेश देण्यात येईल. अधिक संपर्काकरिता ९५९४९०९९८१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. क्रीडा प्रशिक्षण शिबिरात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आव्हान आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

# तेलंगाणा राज्यात 'त्या' रानटी हत्तीने घेतला दुसरा बळी;परिसरात तणावाचे वातावरण



**गडचिरोली । प्रतिनिधी**

छत्तीसगड राज्यातून आलेल्या रानटी हत्तीने लगतच्या तेलंगाणा राज्यात प्रवेश करताच गेल्या २४ तासात दुसरा बळी घेतला आहे.कारू पोशन्ना (५०) असे हत्तीच्या हल्ल्यात ठार झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून परिसरात एकच दहशत निर्माण झाली आहे.

३ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास मुलचेरा तालुक्यातील नागुलवाही गावाजवळून वाहणाऱ्या प्राणहिता नदी ओलांडून रानटी हत्तीने तेलंगाणा राज्यात प्रवेश केला.कुमरमभीम जिल्ह्यातील चिंतला मानेपल्ली तालुक्यात समाविष्ट बुरेपल्ली येथे मिरचीच्या शेतात काम करणाऱ्या अल्लूरी शंकर शेतकऱ्यावर हल्ला करत ठार केले.या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अशातच आज ४ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास आपल्या शेतात भात पिकाला पाणी घालत असलेल्या कारू पोशन्ना नामक शेतकऱ्यांवर त्या रानटी हत्तीने हल्ला करत ठार केले. गेल्या २४ तासात त्या रानटी हत्तीने दोन शेतकऱ्यांचा बळी घेतला आहे.चिंतलामानेपल्ली तालुक्यात रानटी हत्तीचा वावर असलेल्या परिसरात पोलीस, वन आणि महसूल विभागाचे अधिकारी कर्मचार्यांना तैनात करण्यात आले असून त्या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.सध्या त्या रानटी हत्तीवर वन अधिकाऱ्यांनी नजर ठेवली असून त्याने बेजुर तालुक्यातील सुलुगुपल्ली परिसरात आपला मोर्चा वळविल्याचे सांगण्यात येत आहे.तर महाराष्ट्रात सुद्धा आलापल्ली वन विभागातील अधिकारी,कर्मचारी आणि आरआरटी ने देखील प्राणहिता नदीलगत ड्रोन कॅमेराने त्या रानटी हत्तीवर नजर ठेवली आहे.

# शिवसेनेचे माजी जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव झाडे यांचेसह शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.


आज दि. ०४ रोजी हिंगणघाट शहरातील टिळक वार्ड येथील असंख्य महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन ४ एप्रिल २०२४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने शिवसेनेचे माजी जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव झाडे, मंगेश गुजर, राजू भोसकर, नरेश किन्हेकर ,अरुण पोगले, दिनेश कोहाड, गणेश गुळघाणे, श्रीकांत कोटकर, विजय गुरनुले, उमेश डांगरी, राकेश फुलमाळी, प्रतीक साटोणे, मनीष बेदी, किरण कुटेमाटे, विनोद वाकडे, अनिकेत वाकडे, आशुतोष बाकडे, अभिजीत नौकरकार, रवी लाजुरकर, विशाल चिंचुलकर, अमोल चंदनखेडे, नीरज गुजर, विलास कुंभारे, सुमित मसराम, अशोक मसराम, राम पांडे, राहुल मधुकर बाकडे, प्रेमराज कुंभारे, विजय कुंभारे, सचिन कुंभारे, प्रवीण गुजर, कुंदन गुजर, करण गुजर, संजय काटकर, उरकुडा बिडवाईक, सुवर्णा किन्हेकर, विद्याताई काटकर, अरुणा कोहाड, भारतीय रणदिवे, वृषाली पोगले , मीना वाकडे, विद्या नागरकर, वैशाली खेकडे, करून बडेरे, देवकाबाई कुंभारे, वासुदेव कामडी, रामदासजी काटकर, विनोद झाडे, मंगेश गोहने, वैभव गोहणे, डॉ. रामदास वरघणे, दीपक झाडे, सरला काटकर, विशाल गुजर, नरेश गाहणे, दत्तू वाघमारे ईत्यादी महिला व पुरुष कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आ. कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी आ. कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, हिंगणघाट ग्रामीण भाजपा तालुकाध्यक्ष विनोद विटाळे, भाजपा शहराध्यक्ष भूषण पिसे, भाजपा शहर कार्यकारी अध्यक्ष संजय माडे, भाजपा ओबीसी शहराध्यक्ष अनिल चाफले, देवा पडोळे, माजी नगर सेवक नरेश इवनाते, मुन्ना त्रिवेदी, संजय मगर, राजु माडेवार इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

# शनिवारी राजुरा, पांढरकवडा येथे ना.नितीन गडकरी यांची जाहिर सभा

## मोठ्या संख्येत उपस्थित राहण्याचे ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघाचे भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना आणि मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ शनिवारी ०६ एप्रिल २०२४ रोजी राजुरा येथे सकाळी १०.०० वाजता व पांढकवडा (जि. यवतमाळ) येथे दुपारी १.०० वाजता केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आलेली आहे.





केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांच्या जाहिर सभेला चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ना.सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.देशभर रस्ते आणि पुलांचे जाळे निर्माण करून पायाभूत सुविधांना उभारी देणारे केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांच्या सभेची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पालकमंत्री म्हणून ना.सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात सर्वत्र विकास कामांचा तसेच अनेक महत्वाकांक्षी प्रकल्पांचा धडाका लावून जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलला आहे. प्रचार दौरे आणि सभांमधून त्यांच्या कामावर नागरीकही समाधान व्यक्त करून समर्थन देत आहेत. चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळावी तसेच जिल्ह्यात अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास यावेत, याकरिता विकासाला अर्थात ना.सुधीर मुनगंटीवार यांना साथ देण्याचे आवाहन समर्थकांकडून करण्यात येत आहे.

# मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात 'जागतिक जल दिन' निमित्त कार्यशाळेचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

जल हेच जीवन आहे पाण्याशिवाय सजीवसृष्टीची आपण कल्पनाच करू शकत नाही. परंतू वाढत्या लोकसंख्येच्या तसेच वृक्षतोडीमुळे पृथ्वीवरिल पाण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी कमी होत चालले आहे. म्हणूनच यासंदर्भात लोकांमध्ये जनजागृती व्हावी व पाण्याचा योग्य आणि काटेकोर वापर व्हावा या उद्देशाने जागतिक जल दिन २२ मार्च रोजी सर्वत्र साजरा करण्यात येतो.




याच अनुषंगाने मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे प्राणीशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग, वनस्पती शास्त्र विभाग तसेच नेचर क्लब कमिटीच्या वतीने 'जागतिक जल दिना' निमित्य बर्ड फिडर निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

उन्हाळा लागला की पाण्याचे प्रमाण अधिकच कमी होऊ लागते. याचा फटका प्राण्यांना तसेच पक्ष्यांना जास्तच बसतो. परिणामी, ते मृत्युमुखी पडतात. याचे गांभिर्य लक्षात घेऊन 'बर्ड फिडर निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.

सदर कार्यशाळेमध्ये विद्यार्थिनींकडून प्लास्टीक बॉटल्स पासून आकर्षक बर्ड फिडर बनवून घेण्यात आले तसेच त्याचे महत्त्व विद्यार्थिनींना पटवून देण्यात आले. सदर कार्यशाळेसाठी डॉ. नयना शिरभाते, उपप्राचार्या, विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर तसेच डॉ. सपना जयस्वाल, उपप्राचार्या, मातोश्री महिला महाविद्यालय, हिंगणघाट यांची प्रमुख उपस्थिती लाभलेली होती. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा. शितल धार्मिक, प्रा. प्रणिता आष्टणकर, प्रा. अनुश्री भोयर, प्रा. कोमल नांदूरकर, प्रा. दर्शना रेंढे, प्रा. हर्षदा राऊत, प्रा. मोनिका माऊस्कर तसेच विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थिनींचे मोलाचे सहकार्य लाभले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .